## MAHARASHTRA ACT No. XXIII OF 1965

THE MAHARASHTRA GRAMDAN ACT, 1964

महाराष्ट्र विधान मंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १० मार्च १९६५ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**बी. पी. दलाल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXIII OF 1965

AN ACT TO PROVIDE FOR THE ESTABLISHMENT OF GRAMDAN VILLAGES IN PURSUANCE OF THE GRAMDAN MOVEMENT INITIATED BY ACHARYA VINOBA BHAVE, FOR THE CONSTITUTION OF GRAM MANDALS THEREFOR AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH.

## सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक २२ मार्च १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**आचार्य विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या ग्रामदान चळवळीस अनुसरून ग्रामदान गावांची स्थापना करणे, व त्याकरिता ग्राममंडळाची रचना करण्यासाठी आणि तसेच त्याशी संबंधीत असलेल्या बाबीसाठी तरतूद करणे याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, आचार्य विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या ग्रामदान चळवळीस अनुसरून ग्रामदान गावांची स्थापना करणे, व त्याकरिता ग्राममंडळाची रचना करण्यासाठी आणि तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंधराव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण १

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ असे म्हणावे. लघु संज्ञा, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जी तारीख नमूद देईल, त्या तारखेस अंमलात येईल.

व्याख्या.

२. (१) संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "ग्रामदान" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी व त्याच्या उपबंधांनुसार एखाद्या गावातील जमिनीचे स्वेच्छेने दिलेले दान, असा समजावा ;

(ब) "ग्रामदान किसान" या शद्ब प्रयोगाचा अर्थ, या अधिनियमान्वये ग्रामदान किसान म्हणून एखादी जमीन पट्ट्याने धारण करणारा इसम, असा समजावा व तींत, त्याचे वारस व हित-उत्ताधिकारी यांचा समावेश होतो ;

(क) "ग्रामदान गाव" या शद्ब प्रयोगाचा अर्थ, कलम ४ अन्वये ग्रामदान गाव म्हणून जाहीर केलेले गाव, असा समजावा ;

(ड) "ग्राम मंडळ" किंवा [illegible]डळ" म्हणजे, कलम ९ अन्वये रचना करण्यात आलेले ग्राम मंडळ ;

(ई) "सदस्य" म्हणजे, ग्राम मंडळाचा सदस्य ;

(फ) "मालक" या संज्ञेचा अर्थ,—

(एक) बिनदुमला जमिनीच्या संबंधात, तिचा खातेदार, भू-धृतिधारक किंवा यथस्थिती, ज्यास अशी जमीन कबजात ठवण्याचे कायम व वारसाने हक्काने मिळणारे अधिकार आहेत तो इसम, असा समजावा ; आणि

(दोन) दुमाला जमिनीच्या संबंधात, वरिष्ठधारक, असा समजावा ;

आणि त्या संज्ञेत जो, सरकारकडून अधिकारपत्रान्वये किंवा पट्ट्याने किंवा अभिहस्तांकन-द्वारे (कायम अधिकाराखेरीज) जमीन धारण करीत असेल त्या इसमाचा समावश होतो ; आणि "मालकीचे असणे" हा शद्ब प्रयोग व त्याचे व्याकरण दृष्टया होणारे फेरफार यांचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात आला पाहिजे ;

(ग) "पंचायत" म्हणजे, पंचायत अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेली पंचायत ;

(ह) "पंचायत अधिनियम" म्हणजे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ ;

(आय्) कोणत्याही जमिनीच्या संबंधात, "हितसंबंध असलेला इसम" या शद्ब प्रयोगाचा अर्थ, अशा जमिनीवर आपला अधिकार, हक्क किंवा हितसंबंध सांगणारा कोणताही इसम, असा समजावा ; आणि त्या संज्ञेत, ज्यास अशा जमिनीवर वहिवाटीचा हक्क असेल त्या इसमाचा समावेश होतो ;

(ज) "विहित" म्हणजे, नियमाद्वारे विहित केलेले ;

(के) "अध्यक्ष" म्हणजे, ग्राम मंडळाचा अध्यक्ष ;

(ल) "विनियम" म्हणजे, ग्राम मंडळाने केलेले विनियम ;

(म) "गाव" या संज्ञेचा अर्थ, महसुली गाव, किंवा पंचायत अधिनियमाच्या अर्थानुसार असलेले गाव असा आहे आणि तींत, राज्य सरकार ह्या अधिनियमाच्या कारणांकरिता गाव म्हणून जाहीर करील अशा कोणत्याही स्थानिक क्षेत्राचा समावेश होतो.

(२) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु ज्यांची त्यात व्याख्या दिलेली नसेल अशा शब्दांचा व शब्द प्रयोगांचा अर्थ, संदर्भावरून आवश्यक असेल त्याप्रमाणे, राज्याच्या कोणत्याही भागात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या जमीन महसुलासंबंधी असलेल्या विधीत त्यांचा अनुक्रमे जो अर्थ दिला असेल तोच असेल.

अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे.

३. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीत तद्विरुद्ध काहीही असले तरी, या अधिनियमाचे उपबंध परिणामक्षम असतील.

## प्रकरण २

### ग्रामदान गाव

एखादे गाव ग्रामदान गाव म्हणून जाहीर करणे.

४. (१) जेव्हा एखाद्या गावात,—

(अ) ज्या जमिनींच्या संबंधात कलम ५ अन्वये दाखल केलेली प्रतिज्ञापने कायम करण्यात आलेली असतील अशा जमिनींचे क्षेत्र, त्या गावात राहणाऱ्या इसमांच्या मालकीच्या जमिनींच्या एकूण क्षेत्राच्या शेकडा साठ टक्क्यांहून कमी नसेल ;

(ब) ज्या इसमांची प्रतिज्ञापने अशा रीतीने कायम करण्यात आली असतील त्यांची संख्या, त्या आपल्या मालकीची जमीन असलेल्या व त्या गावात राहणाऱ्या इसमांच्या एकूण संख्येच्या शेकडा पंच्याहत्तर टक्क्यांहून कमी नसेल ;

(क) ज्या इसमांच्या संबंधात कलम ५, पोट-कलमे (१) व (३) अन्वये करण्यात आलेली प्रतिज्ञापने कायम करण्यात आली असतील त्यांची संख्या त्या गावात राहणाऱ्या (अज्ञान इसम खेरीजकरून) इसमांच्या संख्येच्या शेकडा पंच्याहत्तर टक्क्यांहून कमी नसेल ; आणि

(ड) कलम ६ अन्वये घेतलेल्या सभेत उपस्थित असलेल्या इसमांपैकी एकावन टक्क्यांहून कमी नाही इतक्या इसमांनी, ग्रामदान समाजात सामील होऊन अशा गावाची ग्रामदान गाव म्हणून रचना करण्यासाठी आपली तयारी दर्शविली असेल,

—तर, त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास विहित करण्यात येईल त्या रीतीने आणि विहित करण्यात येईल अशी चौकशी करून, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, असे गाव, त्या अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या तारखेपासून, "ग्रामदान गाव" म्हणून जाहीर करण्याचा अधिकार असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या प्रत्येक अधिसूचनेची एक प्रत, त्या गावातील एखाद्या प्रमुख ठिकाणी प्रदर्शित करण्यात आली पाहिजे, आणि तिची दुसरी प्रत, ज्या जिल्हाधिकाऱ्याच्या क्षेत्राधिकाराखाली असे गाव असेल त्या जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयातील एखाद्या ठळक ठिकाणी लावली पाहिजे, आणि अशा प्रत्येक अधिसूचनेचा सारांशदेखील विहित केलेल्या रीतीने प्रसिद्ध करण्यात आला पाहिजे.

(३) जर पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या शर्ती विहित केलेल्या तारखेपासून सुरू होणाऱ्या व सहा महिन्यांहून अधिक होणार नाही अशा मुदतीच्या आत पूर्ण करण्यात आल्या नाहीत तर, अशा बाबतीत जिल्हाधिकाऱ्यास, असे गाव हे 'ग्रामदान गाव' म्हणून जाहीर केले जाण्यास पात्र ठरणार नाही. असे विहित केलेल्या रीतीने, आदेशाद्वारे, जाहीर करण्याचा अधिकार असेल ; आणि त्यानंतर कलम ५ अन्वये करून दिलेले प्रत्येक प्रतिज्ञापन ते कायम करण्यात आले असले तरीही परिणामक्षम असणार नाही.

ग्रामदानाच्या रूपाने जमिनीचे स्वेच्छेने हस्तांतरण केल्याबद्दल प्रतिज्ञापन करणे.

५. (१) अज्ञान नसेल अशा कोणत्याही जमिनीच्या मालकास, जिल्हाधिकाऱ्याकडे विहित केलेल्या नमुन्यातील एक प्रतिज्ञापन दाखल करता येईल व त्याद्वारे त्यास, अशा प्रतिज्ञापनात निर्दिष्ट करण्यात आलेल्या गावातील आपली सर्व जमीन आपण ग्रामदानाच्या रूपाने मंडळास दान करीत आहो, म्हणजेच, ती जमीन आपण स्वेच्छेने व कोणताही मोबदला न घेता मंडळाकडे हस्तांतरित करण्याचे कबूल करीत आहो, असे जाहीर करता येईल. अशा प्रतिज्ञापनात, ज्या कोणत्या जमिनी "ग्रामदान किसान" म्हणून धारण करण्याची त्यांची इच्छा असेल त्या जमिनी व ज्या जमिनी, या अधिनियमान्वये भूमिहीन इसमांना वाटून देता येतील त्या जमिनी निर्दिष्ट करण्यात आल्या पाहिजेत :

परंतु, अशा कोणत्याही मालकाने, गावातील आपल्या जमिनींपैकी कोणतीही जमीन भूदानाच्या रूपाने हस्तांतरित केली असेल तर, अशा बाबतीत, जणू अशा रीतीने हस्तांतरित केलेल्या जमिनीचे क्षेत्र त्याच्या जमिनीच्या एकूण क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेले आहे असे समजून ह्या पोट-कलमाचे उपबंध परिणामक्षम होतील ;

तसेच, त्याने ग्रामदान किसान म्हणून धारण करावयाच्या जमिनी निर्दिष्ट करताना ज्यावर कोणतेही भार असतील त्या जमिनी मालकाने निर्दिष्ट केल्या पाहिजेत.

(२) पोट-कलम (१) अन्वये दाखल केलेल्या प्रत्येक प्रतिज्ञापनात,—

(एक) मालक त्या गावाच्या ग्रामदान समाजात दाखल होईल, आणि

(दोन) तो अशा समाजाच्या प्रयोजनांसाठी कलम २७, पोट-कलम (१) चा खंड (ड) च्या उपबंधानुसार ग्राम मंडळास नियतकालिक अंशदान देईल,

अशी हमीसुद्धा अंतर्भूत करण्यात आलेली असली पाहिजे.

(३) एखाद्या गावात राहणाऱ्या (जो अवयस्क नाही अशा) ज्या कोणत्याही इसमांच्या मालकीची त्या गावात कोणतीही जमीन नसेल त्या कोणत्याही इसमास, एक प्रतिज्ञापन दाखल करता येईल व त्याद्वारे त्यास, त्या गावातील ग्रामदान समाजात दाखल होण्याविषयी हमी देता येईल व अशा समाजाच्या प्रयोजनांसाठी, आपल्या निव्वळ वार्षिक उत्पन्नाच्या एक-चाळीसांश भागाइतके नियतकालिक अंशदान मंडळास देण्याचे कबूल करता येईल. असे प्रतिज्ञापन वैयक्तिक स्वरुपात अथवा सामुदायिक स्वरुपात देखील करून देता येईल.

(४) पोट-कलम (१) अन्वये प्रतिज्ञापन मिळाल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, जिल्हाधिकाऱ्याने ते प्रतिज्ञापन विहित केलेल्या रीतीने प्रसिद्ध केले पाहिजे आणि त्यासोबत एक नोटीस जोडून त्या नोटीशीद्वारे, त्याने जमिनीतील हितसंबंध असलेल्या सर्व इसमांना त्याच्या कोणत्याही हरकती असल्यास त्या, अशी नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून पंचेचाळीस दिवसांच्या आत त्याजकडे लेखी सादर करण्याविषयी फर्माविले पाहिजे.

(५) पोट-कलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेली मुदत समाप्त झाल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास त्याजकडे ज्या कोणत्याही हरकती आल्या असतील त्यांचा विचार केल्यानंतर व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आदेशाद्वारे, एकतर असे प्रतिज्ञापन कायम करण्याचा अधिकार असेल किंवा ते प्रतिज्ञापन कायम करण्यास नकार देण्याचा अधिकार असेल.

(६) पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास, अशा आदेशाच्या तारखेपासून पंचेचाळीस दिवसांच्या आंत आयुक्ताकडे अपील करण्याचा अधिकार असेल, आणि आयुक्ताच्या निर्णयास अधीन राहून असा आदेश अंतिम असेल.

(७) प्रतिज्ञापन करून देणाऱ्या इसमास, त्याचे प्रतिज्ञापन कायम करण्यास नकार देण्याविरुद्धचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, या कलमान्वये, असे कोणतेही प्रतिज्ञापन कायम करण्यास नकार देण्याबाबत कोणताही आदेश देता कामा नये.

(८) पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने आदेशाद्वारे, जे कोणतेही प्रतिज्ञापन कायम करण्यास नकार दिला असेल ते प्रतिज्ञापन, जर ते पोट-कलम (६) अन्वये अपिलात कायम करण्यात आले नसेल तर, परिणामक्षम असणार नाही.

*गावात राहणाऱ्या किंवा जमिनींचे दान करणाऱ्या इसमांपैकी बहुसंख्य इसम ग्रामदान समाजात सामील होण्यास तयार आहेत किंवा नाहीत हे निश्चित*

६. (१) गावाची लोकसंख्या विचारात घेता, कलम ५ अन्वये पुरेशा संख्येइतकी प्रतिज्ञापने आली आहेत अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाल्यावर, तावडतोब, सभेत उपस्थित असलेले इतर ग्रामदान समाजात सामील होऊन गावाची ग्रामदान गाव म्हणून रचना करण्यात तयार आहेत किंवा नाहीत हे निश्चित माहीत करून घेण्यासाठी,—

(अ) ज्या गावात पंचायत असेल, त्या गावाच्या बाबतीत, पंचायत अधिनियमान्वये रचना केलेल्या गावाच्या ग्रामसभेची, किंवा

(ब) ज्या गावात पंचायत नसेल त्या गावाच्या बाबतीत, त्या गावात राहणाऱ्या (अज्ञान नसलेल्या) सर्व इसमांची,

आणि ज्यांनी गावातील आपल्या जमिनीचे दान केले असेल, परंतु जे ह्या गावाबाहेर राहात असतील अशाही इसमाची,

सभा बोलाविण्याचा अधिकार आहे.

(२) जिल्हाधिकाऱ्याने अशा सभेची तारीख, वेळ व ठिकाण ठरविले पाहिजे आणि ही माहिती असलेल्या नोटिशीची एक प्रत गावातील ठळक ठिकाणी प्रदर्शित केली पाहिजे. व दुसरी प्रत ज्या

जिल्हाधिकाऱ्याच्या क्षेत्राधिकारात असे गाव असेल त्या जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात एखाद्या ठळक ठिकाणी लावली पाहिजे ; आणि अशा प्रत्येक नोटिशीचा सारांश जिल्हाधिकाऱ्याच्या मते जेणेकरून ही बाब संबंधित इसमाच्या अधिक चांगल्या निदर्शनास येईल अशा इतर रीतीने देखील प्रसिद्ध केला पाहिजे.

(३) अशा सभेत जिल्हाधिकाऱ्याने अध्यक्ष म्हणून कामकाज चालविले पाहिजे ; आणि त्यास अशा सभेत भाषण करण्याचा किंवा अन्यथा त्या सभेच्या कार्यवाहीत भाग घेण्याचा अधिकार असेल, परंतु त्यास मत देण्याचा अधिकार असणार नाही. सभेत अनुसरावयाची कार्यपद्धती; विहित करण्यात येईल अशी असेल, आणि गणपूर्ती होण्यासाठी, पोट-कलम (१) अन्वये सभेस हजर राहण्याचा अधिकार असलेल्या एकूण इसमांच्या एकावन टक्के इसम आवश्यक असतील.

करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने पंचायत अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या ग्रामसभेची सभा भरविणे.

७. (१) ज्या कोणत्याही जमिनीच्या संबंधात प्रतिज्ञापन दाखल करण्यात आले असेल अशी कोणतीही जमीन, कोणत्याही इसमाने, कलम ५ अन्वये असे प्रतिज्ञापन कायम करण्यास नकार दिल्याबद्दलचा आदेश अंतिम होईपर्यंत किंवा ज्या गावात अशी जमीन असेल ते गाव किंवा ग्रामदान गाव होण्यास पात्र नाही असे जाहीर करणारा कलम ४ अन्वये आदेश देण्यात येईपर्यंत ग्रामदान म्हणून देण्यात आलेले दान रद्द करण्यात आले आहे असा कलम ८ अन्वये आदेश देण्यात येईपर्यंत, हस्तांतरित करता कामा नये.

जमिनीचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध.

(२) पोट-कलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन करून जमिनीचे केलेले कोणतेही हस्तांतरण निरर्थक होईल व ते परिणामक्षम असणार नाही.

८. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीत तद्विरुद्ध काहीही असले तरी, ज्या तारखेस एखादे गाव ग्रामदान गाव म्हणून जाहीर करण्यात आले असेल त्या तारखेपासून, आणि त्या गावासाठी ग्राममंडळाची रचना करण्यात आल्यावर,—

ग्रामदान गाव म्हणून जाहीर केल्याचा परिणाम.

(अ) या अधिनियमात अन्यथा जी तरतूद करण्यात आली असेल ती खेरीजकरून ज्यांची प्रतिज्ञापने कलम ५ अन्वये कायम करण्यात आली असतील त्या इसमांचे अशा प्रतिज्ञापनात अंतर्गत करण्यात आलेल्या जमिनींतील किंवा अशा जमिनीवर असलेले सर्व अधिकार, हक्क व हितसंबंध समाप्त होतील व ते सर्व अधिकार, हक्क व हितसंबंध त्या ग्रामदान गावासाठी स्थापन करण्यात आलेल्या ग्राममंडळाकडे हस्तांतरित होतील व ते अशा मंडळामध्ये निहित होतील, परंतु असे अधिकार, हक्क व हितसंबंध हे, दुसऱ्या कोणत्याही इसमाच्या नावे बंधरील्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही अधिकारांना, भारांना किंवा न्याय्य हक्कांना अधीन असतील ;

(ब) ग्राममंडळास कलम ५ मध्ये उल्लेख केलेल्या अंशदानाच्या रकमा स्वीकारण्याचा हक्क असेल ;

(क) ग्राममंडळ पुढील गोष्टींबद्दल जबाबदार असेल :—

(एक) दान देणारांनी दान दिले नसते तर त्यांना ग्राममंडळामध्ये निहित झालेल्या जमिनीच्या संबंधात जमीनमहसूल, खंड, उपकर, पट्टीचा व कर याबद्दल जी कोणतीही रक्कम द्यावी लागली असती ती रक्कम देणे,—मग अशी रक्कम देण्याची जबाबदारी अशी जमीन निहित होण्याची तारखेपूर्वी उद्भवली असो वा तद्नंतर उद्भवली असो ; आणि

(दोन) ग्राममंडळामध्ये निहित झालेल्या कोणत्याही जमिनीसंबंधी कलम ५ अन्वये प्रतिज्ञापनदाखल करण्याच्या तारखेपूर्वी, त्या जमिनीच्या संबंधात निर्माण करण्यात आलेल्या सर्व भारांपासून अशी जमीन मुक्त करणे :

परंतु, अशा जमिनीच्या संबंधात देणे असलेला जमीनमहसूल, खंड, उपकर, पट्टीचा किंवा कर यांची जी कोणतीही रक्कम देण्यास किंवा जमीन अशा रीतीने निहित होण्याच्या तारखेपूर्वी निर्माण करण्यात आलेल्या भारांच्या परतफेडीसाठी ज्या कोणत्याही रकमा देण्यास ग्राममंडळ अशा रीतीने जबाबदार असेल त्या रकमा देण्याच्या कारणासाठी उक्त रकमा ग्राममंडळाने देण्यापूर्वी किंवा दिल्यानंतर, ज्याने ग्रामदानाच्या रूपाने अशी जमीन दान केली असेल त्या मालकाकडून उक्त रकमा, जणू त्या ग्राममंडळास येणे असलेल्या रकमा आहेत असे समजून, वसूल करण्यास ग्राममंडळ सक्षम असेल ;

तसेच, ग्रामदानाच्या रूपाने दान म्हणून दिलेल्या जमिनीच्या संबंधातील भार व इतर जबाबदाऱ्या त्या प्रमाणाबाहेर आहेत असे ग्राममंडळास कोणत्याही बाबतीत आढळून येईल किंवा इतर कोणत्याही कारणांवरून त्याच्या मते अशा जबाबदाऱ्यांपासून मुक्त होण्याचे काम हाती घेणे इष्ट नसेल तर, त्या ग्राममंडळास ग्रामदान करण्यात आले नसते तर ज्या इसमाच्या स्वाधीन जमीन असती त्या इसमास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, आदेशाद्वारे, ग्रामदानाच्या रूपाने दिलेले दान रद्द करण्याचा अधिकार आहे; आणि अशा रीतीने दान रद्द करण्यात आल्यावर, त्या जमिनीतील अथवा अशा जमिनीवर असलेले सर्व अधिकार, हक्क व हितसंबंध ही अशा इसमाकडे प्रत्यावर्तीत होतील आणि अशी मालमत्ता ज्या मुदतीत ग्राममंडळाकडे निहित झाली होती त्या मुदतीत त्या जमिनीच्या संबंधात ज्या कोणत्याही जबाबदाऱ्या उद्भवल्या असतील त्या खेरीजकरून, त्या जमिनींच्या संबंधातील ग्राममंडळाच्या सर्व जबाबदाऱ्या समाप्त होतील ; आणि उपरोक्त ग्रामदानाच्या संबंधी कलम ५ अन्वये दाखल केलेले प्रतिज्ञापन अंमलात राहणार नाही ;

(ड) ग्रामदान गावात असलेल्या आणि ज्यांचे कलम ५ किंवा कलम २९ अन्वये ग्रामदानाच्या रूपाने दान करण्यात आले नाही अशा जमिनीच्या संबंधात देणे असलेला जमीनमहसूल उपकर, पट्ट्या व कर यांच्या रकमा, त्या देण्यास जबाबदार असलेल्या इसमाने ग्राममंडळास दिल्या पाहिजेत :

परंतु, अशा रीतीने वसूल झालेल्या सर्व रकमा, विहित करण्यात येईल असा वसुलीचा खर्च वजा केल्यानंतर, विहित करण्यात येईल अशा वेळेच्या आंत व अशा रीतीने राज्य सरकारकडे पाठविण्यात आल्या पाहिजेत.

## प्रकरण ३

### ग्राममंडळाची रचना

ग्राममंडळ.

९. (१) कलम ४ अन्वये एखादे गाव ग्रामदान गाव म्हणून घोषित करण्यात आल्यावर, कलम १० मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या नोंदणीपुस्तकात ज्यांची नावे समाविष्ट करण्यात आली असतील अशा सर्व इसमांचे, उपरिनिर्दिष्ट प्रतिज्ञापनात निर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेपासून, त्या ग्रामदान गावासाठी ग्राममंडळ संस्थापित करण्यात आले आहे असे समजले पाहिजे ; आणि ग्राममंडळास, या अधिनियमान्वये किंवा तदनुसार किंवा अन्य रीतीने त्याजकडे निहित करण्यात आल्या असतील किंवा त्यास देण्यात आल्या असतील अशा सर्व शक्ती असतील आणि अशी सर्व कामे त्यांनी पार पाडली पाहिजेत.

(२) अशा रीतीने रचना करण्यात आलेले प्रत्येक ग्राममंडळ हे ...... ग्राममंडळ या नावाचे एक व्यक्तिभूत मंडळ असेल ; त्याची परंपरा अखंड असेल आणि त्याचा एक सामाईक शिक्का असेल ; त्यास करार करण्याची शक्ती असेल आणि या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, जंगम किंवा स्थावर अशा दोन्ही प्रकारची मालमत्ता—मग उक्त मालमत्ता त्याचा ज्यावर प्राधिकार असेल अशा ग्रामदान गावांच्या हद्दींतील किंवा हद्दीबाहेरील असो—संपादन करण्याची, धारण करण्याची, तिची व्यवस्था पाहण्याची किंवा तीची विल्हेवाट लावण्याची शक्ती असेल आणि त्यास एकव्यक्तिभूत संस्था म्हणून जे नाव असेल त्या नावाने दावा लावता येईल व तसेच त्या नावाने त्याजवर दावा लावता येईल.

सदस्यांचे नोंदणी पुस्तक.

१०. (१) विधानसभेच्या मतदार संघाचा जो भाग ग्रामदान गावात अंतर्भूत असेल त्या भागासाठी लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०, याच्या उपबंधान्वये तयार करण्यात आलेली महाराष्ट्र विधानसभेच्या मतदारांची यादी ही अशा गावाच्या ग्राममंडळाच्या सदस्यांचे नोंदणीपुस्तक असेल. उक्त नोंदणीपुस्तकात, ज्यांनी ग्रामदानाच्या रूपाने आपल्या जमिनी दान केल्या असतील, परंतु जे उक्त गावात रहात नसतील अशा इसमांची नावे सुद्धा समाविष्ट करण्यात येतील.

(२) जिल्हाधिकाऱ्याने याबाबीत नामोद्दिष्ट केलेल्या, अधिकाऱ्याने, ग्रामदान गावाच्या सदस्यांचे नोंदणीपुस्तक ठेवले पाहिजे, आणि ते, विहित करण्यात येईल अशा मुदतीने, अद्यावत करण्यात आले पाहिजे.

(३) ज्याचे नाव सदस्यांच्या नोंदणीपुस्तकात असेल असा प्रत्येक इसम, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये अपात्र ठरला नसेल तर, मंडळाच्या सभेत मत देण्यास पात्र असेल.

(४) एखादा इसम कोणत्याही प्रकारे अपात्र झाला असेल तर, अशा अपात्रतेस अधीन राहून, सदस्यांचे नोंदणीपुस्तक हे, कोणत्याही इसम मंडळाच्या कोणत्याही सभेत मत देण्यास पात्र आहे किंवा नाही हे या कलमान्वये ठरविण्याच्या कारणासाठी म्हणून, निर्णयक पुरावा असेल.

११. (१) प्रत्येक ग्राममंडळाच्या अध्यक्षस्थानी एक अध्यक्ष असेल व तो, मंडळाकडून त्याच्या सदस्यांमधून, निवडण्यात येईल : ग्राममंडळाचा अध्यक्ष.

परंतु, जर कोणताही इसम पंचायत अधिनियमान्वये पंचायतीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा सदस्य म्हणून चालू रहाण्यास अपात्र झाला असेल तर, त्यास अध्यक्ष म्हणून निवडता कामा नये.

(२) ग्राममंडळाने अध्यक्षाच्या निवडणुकीसाठी उमेदवाराने कोणतीही अनामत रक्कम ठेवा-वयाची असल्यास, अशी अनामत रक्कम आणि त्या रकमा परत करणे किंवा त्या जप्त करणे, नामनिर्देशन पत्र स्वीकारल्याबद्दल किंवा ते नाकारल्याबद्दल निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध अपील करणे, अध्यक्षाच्या निवडणुकीच्या वैधतेसंबंधी उद्भवणाऱ्या विवादाचा निर्णय करणे आणि अशा बाबतीतील निर्णय अंतिम असणे या संबंधातील तरतूद धरून अध्यक्षांची निवडणूक घेण्याबाबत विनियम केले पाहिजेत.

(३) या अधिनियमात अन्यथा जी तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, अध्यक्षाने तो निवडून आल्याच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या चार वर्षांच्या मुदतीपर्यंत पद धारण केले पाहिजे; परंतु, कलम १३, पोट-कलम (२) च्या उपबंधास अधीन राहून, तो फेरनिवडणुकीस पात्र असेल. अध्यक्षाने, या बाबतीत करण्यात आलेल्या विनियमाद्वारे तरतूद करण्यात येतील अशा शक्तींचा वापर केला पाहिजे व अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत.

(४) अध्यक्षाने त्याच्या पदाची मुदत संपली असली तरीही, त्याचा उत्तराधिकारी त्याच्या पदावर येईतोपर्यंत, याबाबतीत करण्यात आलेल्या विनियमाद्वारे निर्दिष्ट करण्यात येतील अशी, त्याच्या पदाची प्रशासनीय कर्तव्ये पार पाडण्याचे चालू ठेवले पाहिजे.

१२. अध्यक्षास स्वतःच्या सहीने जिल्हाधिकाऱ्याच्या नावे लेखी पत्र पाठवून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल, आणि असा राजीनामा त्या बाबतीत विनियमाद्वारे तरतूद करण्यात येईल अशा तारखेपासून अंमलात येईल. अध्यक्षाचा राजीनामा.

१३. (१) या बाबतीत केलेल्या विनियमास अनुसरून (ज्या सभेची नोटीस, सभेच्या पूर्वी सात दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या आधी ग्राममंडळाच्या कार्यालयातील प्रमुख ठिकाणी प्रदर्शित करण्यात आली असेल) अशा खास सभेत अविश्वासाचा ठराव संमत झाल्यावर अध्यक्षास पदावरून काढून टाकता येईल : अध्यक्षास काढून टाकणे.

परंतु, अशा ठरावास, सभेत उपस्थित असलेल्या आणि मत देणाऱ्या एकूण सदस्यांपैकी दोन-तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या बहुमताने पाठिंबा दिला असल्याशिवाय आणि अध्य-क्षास स्पष्टीकरण देण्याची वाजवी संधी देण्यात आली असल्याशिवाय, कोणत्याही अध्यक्षास पदावरून काढून टाकता कामा नये.

(२) खास सभेची मागणी करण्यात आल्यापासून दहा दिवसांच्या मुदतीत अशी खास सभा बोलाविण्यात अध्यक्षाने कसूर केल्यास, कोणत्याही सदस्यास, अशी सभा बोलाविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यास विनंती करता येईल, आणि या अधिनियमात किंवा त्या अन्वये केलेल्या विनियमात काहीही असले तरी, जिल्हाधिकाऱ्याने अशी विनंती मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत, अविश्वा-साच्या ठरावावर विचार करण्यासाठी मंडळाची खास सभा बोलाविली पाहिजे. जिल्हाधिकाऱ्याने अशा सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले पाहिजे ; परंतु त्यास प्रस्तावाच्या गुणावगुणावरून बोलाविण्याचा किंवा मत देण्याचा अधिकार असणार नाही.

(३) वर निर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे पदावरून काढून टाकण्यात आलेला अध्यक्ष, त्याच्या पदाच्या बाकी राहिलेल्या मुदतीत फेरनिवडणुकीसाठी पात्र असणार नाही.

अध्यक्षाचे पद रिकामे होणे. १४. (१) मृत्युमुळे राजीनामा दिल्यामुळे, काढून टाकल्यामुळे किंवा अन्यथा अध्यक्षाचे पद रिकामे झाल्याच्या बाबतीत, उक्त रिकामी जागा ही कलम ११ व १३ च्या उपबंधांस अधीन राहून, सोईस्करपणे शक्य होईल त्याप्रमाणे नवीन अध्यक्षांची निवडणूक करून भरण्यात आली पाहिजे; व असा अध्यक्ष हा, ज्यांच्या जागेवर तो निवडून आला असेल त्या अध्यक्षाने, जागा रिकामी झाली नसती तर ज्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते त्याच मुदतीपर्यंत पद धारण करील.

(२) अध्यक्षाचे पद रिकामे होईल तेव्हां ,जिल्हाधिकारी याबाबतीत नेमील अशा मंडळाच्या अधिकाऱ्याने, अध्यक्षाची निवडणूक होईतोपर्यंत, अध्यक्षाच्या सर्व शक्तींचा वापर केला पाहिजे व त्याची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडली पाहिजेत ; परंतु त्यास मंडळाच्या किंवा कोणत्याही समितीच्या कोणत्याही सभेत मत देण्याचा अधिकार असणार नाही.

समित्या. १५. प्रत्येक ग्राममंडळाने यापुढे तरतूद केलेल्या रीतीने एक कार्यकारी समिती नेमिली पाहिजे आणि तसेच त्यास योग्य वाटतील अशा इतर समित्या नेमण्याचा अधिकार आहे.

कार्यकारी समिती. १६. (१) ग्राममंडळाने एक कार्यकारी समिती स्थापन केली पाहिजे आणि ती पुढील इसमांची मिळून होईल ;

(अ) अध्यक्ष, आणि

(ब) ग्राममंडळ ठरवील इतके आणि त्याबाबतीत केलेल्या विनियमाद्वारे तरतूद केलेल्या रीतीने त्याने आपल्या सदस्यांमधून निवडले असतील असे (दोन पेक्षा कमी नसतील आणि चौदापेक्षा अधिक नसतील असे) सदस्य :

परंतु, जर कोणताही इसम, पंचायत अधिनियमान्वये पंचायतीचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास अपात्र झाला असेल तर, त्यास सदस्य म्हणून निवडता कामा नये.

(२) अध्यक्ष हा, कार्यकारी समितीचा पद-सिद्ध सभापती असेल.

कार्यकारी समित्यांची आणि इतर समित्यांची नेमणूक. १७. (१) ग्राममंडळास, या बाबतीत करण्यात येतील अशा विनियमांस अधीन राहून पुढील कार्यक्रम समित्या नेमता येतील :—

(अ) कृषी समिती,

(ब) शिक्षण समिती, आणि

(क) आरोग्य समिती.

अशा प्रत्येक समितीत ग्राममंडळ या बाबतीत ठरवील इतक्या सदस्यांचा समावेश असेल आणि ती समिती ग्राममंडळ या बाबतीत ठरवील असे अधिकार चालवील व अशी कर्तव्ये पार पाडील.

(२) ग्राममंडळास याबाबतीत केलेल्या विनियमास अधीन राहून, मंडळ ठरवील इतके सदस्य व इतर इसम असलेली आणि मंडळ ठरवील त्या मुदतीसाठी, वेळोवेळी, कोणतीही समिती नियुक्त करण्याचा अधिकार आहे आणि मंडळास योग्य वाटतील अशा या अधिनियमाच्या उद्देशाशी संबंधित असलेल्या गोष्टींची चौकशी करण्यासाठी आणि त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी म्हणून, उक्त गोष्टी अशा समितीकडे सोपविण्याचा अधिकार आहे ; आणि समितीने आपला अहवाल कार्यकारी समितीकडे सादर करण्याबद्दल निदेश देण्याचा अधिकार आहे.

[कार्य]कारी [समि]तीच्या [सदस्]यांचा [पदाव]धी, [राजी]नामा, . १८. (१) कार्यकारी समितीच्या सदस्यांचा पदावधी हा या बाबतीत केलेल्या विनियमाद्वारे तरतूद करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(२) कार्यकारी समितीच्या कोणत्याही सदस्यास सभापतीच्या नावे, स्वतःच्या सहीने लेखी पत्र पाठवून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल, आणि त्यानंतर त्याचे पद रिकामे होईल.

(३) मृत्यू पावल्यामुळे, राजीनामा दिल्यामुळे किंवा अन्यथा, कोणत्याही सदस्याचे पद रिकामे झाल्याच्या बाबतीत, उक्त पद हे सोईस्करपणे शक्य होईल त्याप्रमाणे नवीन सदस्यांची निवडणूक करून भरण्यात आले पाहिजे; व उक्त सदस्य हा, ज्याच्या पदावर तो निवडून आला असेल त्या

सदस्याचे पद रिकामे झाले नसते तर त्याने ज्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते त्याच मुदतीपर्यंत, पद धारण करील.

(४) कार्यकारी समितीतील कोणतेही पद रिकामे असताना, विद्यमान सदस्यांस, जणू कोणतेही पद रिकामे झाले नव्हते असे समजून काम करण्याचा अधिकार आहे.

१९. कार्यकारी समितीने, या बाबतीत केलेल्या विनियमाद्वारे तरतूद करण्यात येतील अशा शक्तींचा वापर केला पाहिजे, अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत आणि अशी कामे केली पाहिजेत : कार्यकारी समितीच्या शक्ती व कर्तव्ये.

परंतु कार्यकारी समितीने आपल्या शक्तींपैकी, कर्तव्यांपैकी व कामांपैकी कोणतीही शक्ती, कर्तव्ये व कामे ही त्या बाबतीत केलेल्या विनियमास अनुसरून सभापतीकडे सोपविणे हे विधीसंमत असेल.

२०. ग्राममंडळ आणि त्याच्या समित्या यांचे कामकाज हे विनियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने चालविण्यात आले पाहिजे आणि अशा विनियमात ज्या बाबतीत ग्राममंडळ किंवा त्याच्या समित्या यांचे निर्णय एकमताने किंवा जवळ जवळ एकमताने म्हणजेच, सभेस हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या पंच्याहत्तर टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या बहुमताने, घेण्यात आले पाहिजेत अशा बाबी निर्दिष्ट करता येतील. ग्राममंडळाचे व समित्यांचे कामकाज चालविणे.

२१. (१) ग्राममंडळास,— ग्राममंडळाचे अधिकारी व कर्मचारी.

(अ) चिटणीसाची नेमणूक करण्याचा अधिकार आहे व चिटणीसाने विनियमाद्वारे विहित करण्यात येतील किंवा अध्यक्ष त्याजकडे सोपवील अशा शक्तींचा वापर केला पाहिजे आणि अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत ;

(ब) आपली कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील असे इतर अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्याचा अधिकार आहे.

(२) चिटणीस, इतर अधिकारी व कर्मचारी यांस याबाबतीत केलेल्या विनियमाद्वारे विहित करण्यात येतील अशी वेतने व भत्ते देण्यात येतील आणि ते विहित करण्यात येतील अशा शर्तीस व अटींस आधीन असतील.

(३) ग्राममंडळास, विनियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत आणि अशा रीतीने चिटणीस किंवा इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांस सेवेतून काढून टाकण्याचा अधिकार आहे.

## प्रकरण ४

### महाराष्ट्र ग्रामदान मंडळ व ग्राम समित्या यांची स्थापना

२२. (१) यापुढे निर्दिष्ट केलेल्या कारणांकरिता, राज्य सरकारने, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र ग्रामदान मंडळ म्हणून संबोधण्यात यावयाचे एक मंडळ स्थापन केले पाहिजे. महाराष्ट्र ग्रामदान मंडळ व त्याची कामे.

(२) ग्रामदान मंडळात, सभापती आणि (चिटणीस धरून) पाचपेक्षा कमी नसतील आणि नऊपेक्षा अधिक नसतील इतके इतर सदस्य यांचा समावेश असेल. सभापती व चिटणीस यांची नेमणूक राज्य सरकारकडून करण्यात येईल.

(३) मंडळाचा सभापती व त्याचे सदस्य हे, त्यांच्या नेमणुकीच्या तारखेपासून चार वर्षांच्या मुदतीपर्यंत पद धारण करतील. अशी नेमणूक राजपत्रात अधिसूचित करण्यात आली पाहिजे ; आणि ते पुन: नेमणूक केली जाण्यास पात्र असतील.

(४) सभापतीस किंवा मंडळाच्या कोणत्याही सदस्यास, राज्य सरकारला उद्देशून स्वत:च्या सहीने पत्र पाठवून आपल्या पदाचा राजिनामा देता येईल, परंतु राजिनामा स्वीकारण्यात येईपर्यंत ते पद रिकामे होणार नाही.

(५) मंडळावरील एखादी जागा रिकामी झाल्यास सभापतीने किंवा चिटणीसाने, अशी जागा रिकामी झाल्याबद्दल तावडतोब राज्य सरकारला कळविले पाहिजे आणि ती रिकामी जागा सोयिस्कर-

पणे शक्य असेल तितक्या लवकर भरण्यात आली पाहिजे, परंतु या जागेवर नेमण्यात आलेला इसम, ज्याच्या जागेवर त्याची नेमणूक करण्यात आली असेल त्या सदस्याने अशी जागा रिकामी झाली नसती तर जेवढ्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते, तेवढ्याच मुदतीपर्यंत पद धारण करील.

(६) सभेची वेळ, तिच्या बैठकीची जागा, तिचे कामकाज चालविणे आणि अशा सभेत अनुसरावयाची कार्यपद्धती ही ग्रामदान मंडळ विनियमाद्वारे ठरवील त्याप्रमाणे असेल.

(७) ग्रामदान मंडळाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) अधिनियमाचे उद्देश व उद्दिष्टे यांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनाकरिता कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे ;

(ब) ग्रामदान गावाच्या विकासात येणाऱ्या सर्वसाधारण अनुभवाचा अभ्यास करणे व मूल्यमापन करणे ;

(क) ग्रामदान गावाच्या संबंधातील विधिविषयक व इतर औपचारिक कामे तातडीने करणे.

ग्राम-समित्यांची स्थापना.

२३. (१) प्रत्येक ग्रामदान गावासाठी एक ग्राम समिती असेल.

(२) ग्राम समितीत पुढील इसमांचा समावेश असेल :—

(अ) ग्रामदान गावात राहणाऱ्या प्रत्येक कुटंबातील एक प्रतिनिधी ; आणि

(ब) ग्रामदान गावात न राहणाऱ्या परंतु जमीन दान देणाऱ्या प्रत्येक कुटंबातील एक प्रतिनिधी.

(३) ग्रामसमितीचे अध्यक्षस्थान सभापतीने स्वीकारले पाहिजे. अशा सभापतीची निवड त्या बाबतीत केलेल्या विनियमाद्वारे तरतूद करण्यात आलेल्या रीतीने करण्यात आली पाहिजे.

(४) ग्रामसमितीचे सदस्य व तिचा सभापती यांच्या पदाची मुदत, त्यांचे राजिनामे, त्यांच्या पदाच्या रिकाम्या झालेल्या जागा भरणे, ग्रामसमितीचे कामकाज चालविणे आणि त्याच्याशी आनुषंगिक असतील अशा इतर सर्व बाबी, त्या बाबतीत केलेल्या विनियमांद्वारे ठरविण्यात येतील व त्याद्वारे त्यांचे नियमन करण्यात येईल.

(५) ग्रामसमितीस, या बाबतीत मंडळाने केलेल्या विनियमांद्वारे तरतूद करण्यात येतील अशी सल्ला देण्याच्या स्वरुपाची कामे करता येतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांकरिता "कुटुंब" या संज्ञेत हिंदु अविभक्त कुटुंबाचा समावेश होतो आणि इतर इसमांच्या बाबतीत, रूढीने किंवा वहिवाटीने ज्या गटाचे किंवा घटकाचे सदस्य मालमत्ता किंवा कबजा किंवा निवास यांच्या बाबतीत एकत्र असतील अशा गटाचा किंवा घटकाचा समावेश होतो.

## प्रकरण ५

## भूमिसंचयाची स्थापना आणि जमिनीचे वाटप

भूमिसंचय

२४. (१) ग्रामदानाच्या रूपाने किंवा या अधिनियमाच्या कारणासाठी अन्य रीतीने ग्राममंडळाकडे निहित झालेल्या सर्व जमिनी मिळून एक भूमिसंचय तयार होईल.

(२) मंडळाने कलम ५ अन्वये करण्यात आलेली प्रतिज्ञापने विचारात घेऊन भूमिहीन इसमांच्या फायद्यासाठी म्हणून मंडळ ठरवील त्याप्रमाणे भूमिसंचयामधील जमिनीच्या क्षेत्राच्या पाच टक्क्यांपेक्षा कमी नसेल एवढी जमीन वेगळी ठेवली पाहिजे आणि बाकी जमिनी यापुढे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे त्यांच्या पूर्वीच्या मालकांना परत करण्यासाठी वेगळ्या ठेवल्या पाहिजेत किंवा मंडळास पर्याय म्हणून दान दिलेल्या सर्व जमिनींच्या पाच टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतके क्षेत्र असलेल्या जमिनीचा सलग तुकडा दान देणाऱ्या इसमांच्या खर्चाने खरेदी करता येईल, आणि दान देणाऱ्या प्रत्येक इसमाने त्याने दान दिलेल्या जमिनीच्या पाच टक्क्यांइतक्या क्षेत्राबद्दलची रक्कम खरेदीची किंमत म्हणून दिली पाहिजे.

२५. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत तद्‌विरुद्ध काहीही असले तरी परंतु या अधिनियमाच्या उपबंधांस आधीन राहून, ग्राममंडळास त्याच्याकडे निहित असलेल्या जमिनी पट्ट्याने देण्याची शक्ती असेल आणि पट्टेदारास या अधिनियमान्वये किंवा तदनुसार तरतूद केल्या-प्रमाणे असेल त्या व्यतिरिक्त अशा जमिनीच्या संबंधांत कोणतेही हक्क असणार नाहीत आणि त्यास अशा कोणत्याही हक्कासाठी दावा सांगण्याचा अधिकार असणार नाही. जमीन पट्ट्याने देण्याची मंडळाची शक्ती.

२६. (१) त्या बाबतीत केलेल्या विनियमांस अनुसरून मंडळाने,— जमिनीचे पट्ट्याने वाटप करणे.

(अ) कलम २४ अन्वये भूमिहीन इसमांसाठी वेगळ्या ठेवण्यात आलेल्या किंवा त्यांच्या फायद्यासाठी खरेदी केलेल्या जमिनींपैकी कोणतीही जमीन, जातीने कसण्यासाठी म्हणून कोणत्याही भूमिहीन इसमास किंवा भूमिहीन इसमाच्या गटास (प्राधान्येकरून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी करण्यात आलेली किंवा नोंदणी झाल्याचे समजण्यात आलेल्या अशा भूमिहीन इसमांच्या सहकारी कृषि संस्थेस) पट्ट्याने दिली पाहिजे ;

(ब) बाकी जमिनी त्यांच्या पूर्वीच्या मालकांना पट्ट्याने दिल्या पाहिजेत.

(२) या कलमान्वये कोणत्याही नियोजित पट्ट्यामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास, ग्राममंडळाकडे तशा अर्थाचा अर्ज करण्याचा अधिकार आहे ; आणि मंडळाने, असा अर्ज मिळाल्यावर, ती बाब, पोट-कलम (३) अन्वये रचना करण्यात आलेल्या लवाद मंडळाकडे निर्णयासाठी पाठविली पाहिजे.

(३) लवाद मंडळ हे तीन इसमांचे मिळून होईल ; त्यांपैकी दोन इसम हे प्रत्येक पक्षकाराने एक याप्रमाणे नामनिर्दिष्ट केले पाहिजेत आणि तिसरा इसम हा अर्जदार व मंडळ यांनी संयुक्तरीत्या नेमला पाहिजे आणि तिसरा लवादाच्या नेमणुकीबाबत मतभेद असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने त्याची नेमणूक केली पाहिजे.

(४) लवाद मंडळाने आपल्या कार्यपद्धतीचे नियमन केले पाहिजे.

(५) लवाद मंडळाचा निर्णय अंतिम असेल आणि पक्षकारावर तो बंधनकारक असेल.

२७. (१) कलम २६ अन्वये ज्याला जमीन पट्ट्याने देण्यात आली असेल अशा इसमाने, पुढील अटींवर व शर्तींवर ती धारण केली पाहिजे :— पट्ट्याच्या शर्ती.

(अ) जमीन पट्ट्याने धारण करण्याबाबतचे अधिकार पट्टेदाराच्या मृत्युनंतर त्याच्या वारसा-कडे जातील ;

(ब) पट्टेदाराने जमिनीतील आपला हितसंबंध,—

(एक) त्यांच्यामध्ये कबूल करण्यात आलेल्या अटींवर व शर्तींवर, ज्या गावात जमीन असेल त्या गावच्या ग्रामदान समाजात सामील झालेला इसम ;

(दोन) ग्राम मंडळ ; किंवा

(तीन) कोणतीही सहकारी संस्था, संस्था किंवा सरकार यांजकडून घेतलेल्या कोणत्याही रकमेच्या परतफेडीबद्दल हमी म्हणून, राज्य सरकारने या बाबतीत मान्यता दिलेली कोणतीही संस्था किंवा सरकार,—

यांच्या व्यतिरिक्त इतर कोणासही हस्तांतरित करता कामा नये ;

परंतु, भूमिहीन इसमाने ग्राममंडळाची पूर्वमंजूरी घेतल्याशिवाय आपला हितसंबंध वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे हस्तांतरित करता कामा नये ;

(क) पट्टेदाराने, विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी किंवा तारखांपूर्वी जमिनीच्या संबंधात देणे असेल असा कोणताही जमीन महसूल, खंड, उपकर, पट्टी किंवा इतर कर यांच्या रकमे-इतकी रक्कम मंडळास दिली पाहिजे ;

(ड) पट्टेदाराने दरवर्षी आपल्या शेतीच्या निव्वळ उत्पन्नाचा एक-चाळिसांश भाग किंवा याबाबतीत मंडळ ठरवील असा त्याहून कमी असलेला इतर भाग अंशदान म्हणून दिला पाहिजे.

(इ) पट्टेदाराने दोन वर्षांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत, जमीन लागवडीविना पडू देता कामा नये ;

(फ) कलम ३० च्या उपबंधांस आधीन राहून मंडळाने पट्टेदाराने किंवा त्याच्या वारसाने धारण केलेल्या जमिनीच्या कबजात त्याच्या संमतीशिवाय ढवळाढवळ करता कामा नये ;

(ग) जमीन दान करण्यात येण्याच्या निकटपूर्वी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही पट्ट्याच्या अधीन असेल अशा जमिनीच्या बाबतीत, ग्रामदान किसानास, जणू तो उक्त जमिन पट्ट्याने देणारा इसम म्हणून चालू आहे असे समजून, भूसत्ता प्रकारासंबंधी त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधांस अनुसरून उक्त जमिनीचा कबजा परत मिळण्याचा अधिकार असेल आणि पट्टा समाप्त होईपर्यंत, त्यास अशा जमिनीच्या संबंधांत पट्टेदाराने द्यावयाचा खंड वसूल करण्याचासुद्धा अधिकार असेल ;

(ह) जमीन दान करण्यात येण्याच्या निकटपूर्वी कबजेगहाण असलेल्या जमिनीच्या बाबतीत, जर ग्रामदान किसान ते कबजेगहाण सोडवून घेण्यासाठी म्हणून देण्यात आलेली रक्कम, त्यासंबंधातील सर्व खर्चासहित, ग्राममंडळास देईल तर, त्यास ग्राममंडळाने उक्त जमीन गहाणातून मुक्त केल्यानंतर, तिचा कबजा मिळण्याचा अधिकार असेल ;

(आय्) कोणत्याही ग्राममंडळाच्या संबंधात असलेली परिस्थिती विचारात घेऊन, मंडळ त्याबाबतीत दिलेल्या आदेशाद्वारे ठरवील अशा इतर अटी व शर्ती.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, ग्रामदान किसानाने आपली जमीन दान देण्याच्या किंवा यथास्थिती मंडळाने भूमिहीन व्यक्तीला ती पट्ट्याने देण्याच्या निकटपूर्वी—

(अ) ग्रामदान किसानास जो अधिकार नव्हता असा कोणताही अधिकार त्यास प्रदान केला आहे असे,

(ब) मंडळास जो अधिकार नव्हता असा कोणताही अधिकार भूमिहीन व्यक्तीस प्रदान केला आहे असे,

मानले जाणार नाही.

## प्रकरण ६

### ग्राममंडळाच्या शक्ती व त्याची कामे

ग्राम-मंडळाच्या शक्ती व त्याची कामे.

२८. (१) ग्राममंडळाकडे व्यवस्थेसाठी ज्या जमिनी येतील अशा जमिनींसह ग्राममंडळ त्याच्याकडे निहित करण्यात आलेल्या जमिनींची व्यवस्था पाहील, आणि ग्रामीण समाजाच्या व त्यामधील लोकांच्या कल्याणाकरिता कामे हाती घेईल, आणि त्यास आनुषंगिक असलेल्या इतर सर्व गोष्टी करील.

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, ग्राममंडळास पुढील गोष्टी करता येतील :—

(अ) ग्रामीण समाजात सामुदायिक जबाबदारीची, परस्पर सहाय्याची भावना निर्माण करण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी आणि सहकारी कार्यास चालना देण्यासाठी किंवा ती हाती घेण्यासाठी किंवा त्यात भाग घेण्यासाठी उपाय योजणे ;

(ब) ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण आणि एकात्मीकृत विकासास चालना देण्यासाठी उपाय योजणे ;

(क) निराश्रित मुले आणि वृद्ध व अपंग व्यक्तींच्या पालनपोषणाची व्यवस्था करणे ;

(ड) गावातील शेतीची सुधारणा करण्यासाठी आणि गावातील जमिनीचा उत्तम रीतीने उपयोग करण्यासाठी योजना तयार करणे व त्या कार्यान्वित करणे ;

(इ) सामुहिक प्रयोजनांसाठी जमीन अलग राखून ठेवणे ;

(फ) गावातील लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांना उत्तेजन देणे व गावाच्या सर्वसाधारण विकासाच्या आणि स्थानिक साधनसामग्री व मनुष्यबळ यांचा योग्य उपयोग करण्याच्या योजना तयार करणे व त्या कार्यान्वित करणे ;

(ग) भूमिहीन इसमांसाठी उपलब्ध असलेल्या जमिनी वाटून देणे ;

(ह) राज्य सरकारच्या संमतीस आधीन राहून अन्न, वस्त्र आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत प्रादेशिक स्वयंपूर्णतेकरिता योजना तयार करणे व त्या कार्यान्वित करणे आणि हे साध्य करण्याकरिता राज्य सरकारचे व गावात किंवा त्याच्या आसपास काम करणाऱ्या इतर संस्था किंवा एजन्सी यांचे सहकार्य व सहाय्य मिळविणे ;

(आय) जमिनींचे एकत्रीकरण करण्यास उत्तेजन देणे ;

(ज) ग्राममंडळाच्या कोणत्याही सदस्यास—मग तो त्याच्या जमिनीचा पट्टेदार असो किंवा नसो—कोणत्याही कारणाकरिता—मग ते शेतीविषयक असो वा नसो— कर्जे मंजूर करणे ;

(के) जमिनीची सुधारणा व पडीत जमिनी नवसाध्य करण्याकरिता आणि शेतीच्या लागवडीच्या सुधारलेल्या पद्धती सुरू करण्याकरिता उपाययोजना करणे ;

(ल) गावाच्या औद्योगिक विकासास चालना देणे ;

(म) गावातील बेकारी नष्ट करण्याचे कार्य सुकर करणे ;

(न) सामाजिक प्रयोजनांकरिता गावातून स्वयंस्फूर्तीने वर्गणी उभारणे ;

(ओ) ग्रामनिधीचे हिशेब ठेवणे ;

(प) ग्राममंडळाखालील व्यक्तींच्या ताब्यात असलेल्या जमिनींसंबंधीचा तपशील देणारे नोंदणी-पुस्तक धरून गावाचे अभिलेख तयार करणे व ठेवणे ;

(क्यू) शांततामय मार्गाने गावात शांतता राखण्यासाठी ग्राम शांतता दल किंवा शांती दल उभारणे ;

(र) त्याच्या अधिकाराखालील ग्रामीण समाजासाठी घरबांधणी, शिक्षण व वैद्यकीय सहाय्य यांसाठी योजना तयार करणे व त्या कार्यान्वित करणे ;

(स) त्याच्या सदस्यांच्या खाजगी कर्जाच्या संबंधात समेट करण्यास उत्तेजन देणे ;

(ट) वेळोवेळी विहित करण्यात येतील अशी इतर कृत्ये व कर्तव्ये करणे आणि अशा इतर शक्तींचा वापर करणे.

**ग्रामदान गावाची स्थापना झाल्यानंतर जमिनीची दाने स्वीकारण्याची ग्राममंडळाची शक्ती.**

२९. (१) ग्रामदान गावात जमीन धारण करणाऱ्या जमिनीच्या (अज्ञान नसलेल्या) कोणत्याही मालकास, कलम ५ अन्वये दानाच्या बाबतीत तरतूद केलेल्या रीतीने व तरतूद केलेल्या शर्तींवर आपल्या सर्व जमिनी ग्रामदानाच्या रूपाने दान म्हणून देता येतील आणि त्यानंतर, पोट-कलम (२) च्या उपबंधांस आधीन राहून या अधिनियमाचे उपबंध शक्य असेल तेथवर, जणू असे दान त्या कलमान्वये करण्यात आले आहे असे समजून लागू होतील :

परंतु, या कलमान्वये केलेले कोणतेही प्रतिज्ञापन जिल्हाधिकाऱ्याने ग्राममंडळाच्या संमतीशिवाय कायम करता कामा नये.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेले प्रतिज्ञापन ज्या तारखेस कायम करण्यात आले असेल त्या तारखेपासून ज्याचे प्रतिज्ञापन अशा रीतीने कायम करण्यात आले असेल, अशा कोणत्याही इसमाचे अशा प्रतिज्ञापनाच्या कक्षेतील जमिनीतील किंवा जमिनीवरील सर्व अधिकार, हक्क आणि हितसंबंध हे, या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, संपुष्टात येतील आणि ते त्या ग्रामदान गावाकरिता स्थापन केलेल्या ग्राममंडळाकडे हस्तांतरित होतील व त्याच्यामध्ये निहित

होतील ; आणि त्यानंतर या अधिनियमाचे उपबंध ,शक्य असेल तेयवर जणू ते प्रतिज्ञापत्र कलम ५ अन्वये कायम केले होते असें समजून लागू होतील.

(३) ग्रामदान गावात राहणाऱ्या (अज्ञान नसलेल्या) ज्या इसमाने कलम ५ किंवा या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये ग्रामदानाच्या रूपाने दान केले नसेल अशा कोणत्याही इसमास कलम ५ पोट-कलम (३) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने व शर्तीच्या अधीन राहून ग्रामदान समाजात सामील होता येईल आणि त्यानंतर या अधिनियमाचे उपबंध, शक्य असेल तेथवर, असे प्रतिज्ञापन हे जणू कलम ५, पोट-कलम (३) अन्वये केलेले आहे आहे समजून लागू होतील.

पट्टा वगैरे रद्द करण्याची मंडळाची शक्ती.

३०. (१) जर ग्राम मंडळामधील एखादा पट्टेदार—

(अ) कलम २७, पोट-कलम (१) खंड (ब) च्या उपबंधांचे उल्लंघन करून जमिनीतील आपला हितसंबंध हस्तांतरित करील, किंवा

(ब) त्यास पट्ट्याने दिलेल्या जमिनीच्या संबंधांत देणे असलेल्या कोणत्याही रकमा देण्यात कसूर करील, किंवा

(क) लागोपाठ दोन वर्षेपर्यंत जमीन कसण्यास कसूर करील,

तर, ग्राममंडळास, पट्टा रद्द करण्यासाठी आणि ती जमीन त्याच्या कबजात असल्यास पट्टेदारास त्यामधून काढून टाकण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल ; आणि त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि पट्टेदारास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, यथास्थिति पट्टा रद्द करता येईल किंवा यथास्थिती काढून टाकण्याचा आदेश देता येईल व अशा आदेश दिल्याच्या बाबतीत पट्टेदारास किंवा ती जमीन ज्याच्या कबजात असल्याचे आढळून येईल अशा कोणत्याही इतर इसमास जमिनीतून काढून टाकून त्या जमिनीचा कबजा ग्राममंडळाकडे परत देता येईल:

परंतु, अशी जमीन वैध रीतीने ज्या इसमाच्या कबजात असेल अशा कोणत्याही इसमाच्या अधिकारास त्यामुळे बाध येणार नाही.

(२) या कलमान्वये जमिनीचा कबजा परत देण्याबाबत दिलेल्या कोणत्याही आदेशाची अमलबजावणी, ती जमीन ज्याच्या अधिकारक्षेत्रात असेल त्या मामलेदाराने किंवा तहसीलदाराने, जणू तो, मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६, अन्वये मामलेदाराने दिलेला निर्णय आहे असे समजून त्या अधिनियमाच्या कलम २१ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, केली पाहिजे.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरीही, जिल्हाधिकाऱ्यास त्या पोट-कलमाचा खंड (ब) किंवा खंड (क) च्या कक्षेतील कारणांपैकी कोणत्याही कारणावरून पट्टा रद्द करण्याऐवजी किंवा त्यास काढून टाकण्याचा आदेश देण्याऐवजी, आदेशाद्वारे तो निर्दिष्ट करील अशा रीतीने व अशा मुदतीपर्यंत ग्राममंडळास त्या जमिनीची व्यवस्था आपल्याकडे घेण्याचा निदेश देता येईल ; आणि त्यास, त्या जमिनीची व्यवस्था ग्राममंडळास आपल्याकडे घेता यावी म्हणून त्यास योग्य वाटेल असा आणखी आदेश देता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये कोणत्याही जमिनीची व्यवस्था आपल्याकडे घेण्यात आली असेल अशा कोणत्याही बाबतीत ग्राममंडळाने विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कालांतरांनी व्यवस्थेच्या कालावधीत जमिनीपासून मिळालेले अतिरिक्त उत्पन्न, कोणतेही असल्यास, जमिनमहसूल, खंड, उपकर, पट्टा, कर व येणे असलेल्या इतर रकमा याबद्दल आणि कोणतेही बोजे असल्यास त्याबद्दल ग्राममंडळास पट्टेदाराकडून येणे असलेल्या सर्व रकमा त्यामधून वजा करून, पट्टेदारास दिल्या पाहिजेत.

(५) या कलमान्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास अशा आदेशाच्या तारखेपासून पंचेचाळीस दिवसांच्या आत आयुक्ताकडे अपील दाखल करता येईल. आयुक्तास, अशा पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, अपिलावर त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल. आयुक्ताच्या निर्णयास अधीन राहून, या कलमान्वये, जिल्हाधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक आदेश अंतिम असेल.

कर्ज काढण्याची शक्ती.

३१. (१) याबाबतीत करण्यात आलेल्या नियमांस अधीन राहून, ग्राममंडळास ज्या प्रयोजनांकरिता त्याची स्थापना करण्यात आली ती प्रयोजने पार पाडण्याकरिता ग्रामनिधीच्या किंवा त्याच्याकडे निहित केलेल्या किंवा त्याच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेच्या तारणावर पैसा उभारता येईल.

(२) ग्राममंडळास, अशा कोणत्याही प्रयोजनांकरिता, कोणत्याही सरकारकडून, ते सरकार ठरवील अशा शर्तींवर व अटींवर कर्ज देखील मिळविता येईल.

ग्राममंडळाने येणे असलेल्या रकमा जमीन-महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करणे.

३२. येणे असलेल्या जमीनमहसुलाची कोणतीही थकबाकी, उपकर, पट्टा किंवा कर किंवा अंशदान म्हणून किंवा इतर प्रकारे ग्राममंडळास येणे असलेली कोणतीही रक्कम ग्राममंडळाने जिल्हाधिकाऱ्यास दिलेल्या प्रमाणपत्रावरून, जिल्हाधिकाऱ्याने जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल केली पाहिजे आणि ती ग्राममंडळास दिली पाहिजे.

## प्रकरण ७

### ग्रामनिधी

ग्रामनिधी.

३३. (१) प्रत्येक ग्रामदान गावात ग्रामनिधी या नावाचा एक निधी असेल. पंचायत अधिनियमान्वये स्थापन केलेल्या ग्रामनिधीपासून तो वेगळा व विभिन्न ठेवण्यात येईल.

(२) ग्रामनिधीत पुढील रकमा देण्यात येतील आणि त्या ग्रामनिधीचा भाग असतील :—

(अ) ग्राममंडळाने हाती घेतलेल्या कोणत्याही लागवडीचा किंवा कोणत्याही कामाचा नफा धरून ग्राममंडळास मिळालेल्या सर्व रकमा व पैसा आणि ज्यांना या अधिनियमान्वये जमिनी पट्याने दिलेल्या असतील अशा इसमांवर आकारलेले किंवा बसविलेले भाडें, फी किंवा इतर आकार ;

(ब) कोणत्याही सरकारकडून, कर्ज म्हणून, मिळालेल्या सर्व रकमा ;

(क) अनुदाने, दाने, देणग्या, मृत्युपत्रादाने किंवा अंशदाने म्हणून मिळालेल्या सर्व रकमा.

ग्रामनिधीचा विनियोग.

३४. या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, ग्राममंडळाने केवळ या अधिनियमाच्या कारणांकरिता ग्रामनिधीचा विनियोग केला पाहिजे. ग्रामनिधी विहित करण्यात येईल अशा अभिरक्षेत ठेवण्यात आला पाहिजे.

हिशोब आणि हिशोब तपासणी.

३५. ग्रामनिधीतून ज्या रीतीने रकमा देण्यात येतील, आणि हिशोब ठेवण्यात येईल किंवा त्याची हिशोबतपासणी किंवा पुन्हा हिशोबतपासणी करण्यात येईल ती रीत याबाबतीत केलेल्या विनियमानुसार विनियमित करण्यात येईल. सर्व लेखा परीक्षक, राज्य सरकारच्या संमतीने नेमण्यात येतील.

## प्रकरण ८

### संकीर्ण

ग्राममंडळ, ग्रामदान, किसान किंवा भूमिहीन इसम यांनी धारण केलेल्या जमिनींच्या विक्रीवर निर्बंध.

३६. ग्राममंडळास दान केलेल्या कोणत्याही जमिनीतील ग्रामदान किसानाचा किंवा भूमिहीन इसमांचा हितसंबंध किंवा ग्राममंडळाचा कोणत्याही जमिनीतील हितसंबंध, ग्रामदान, किसान, भूमिहीन इसम किंवा यथास्थिती ग्राममंडळ यांच्याकडून येणे असलेल्या रकमा देण्यात कोणतीही कसूर केल्याच्या कारणास्तव विकण्यात आला असेल तेव्हा, ग्राममंडळ किंवा ती जमीन ज्या गावात असेल त्या गावाच्या ग्रामदान समाजात सामील झालेला इसम या व्यतिरिक्त इतर कोणत्याही इसमास विकता कामा नये.

**सहकारी संस्था म्हणून ग्राममंडळाची नोंदणी करणे**

३७. कोणत्याही ग्राममंडळास, महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम, १९६०, अन्वये सहकारी संस्था म्हणून आपली नोंदणी करता येईल.

**मुद्रांक शुल्क वगैरेची माफी देण्याची शक्ती.**

३८. राज्य सरकारला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पुढील गोष्टींची सूट देता येईल :—

(अ) या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही प्रतिज्ञापत्रावर किंवा ग्राममंडळाने किंवा त्याच्या वतीने करून देण्यात आलेल्या कोणत्याही लेखावर, त्यावेळी अमलात असलेल्या मुद्रांक शुल्का-संबंधीच्या कोणत्याही विधीअन्वये आकारण्याजोगे मुद्रांक शुल्क ;

(ब) दस्तऐवजांची नोंदणी करण्यासंबंधी त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही विधी-अन्वये, ग्रामदान म्हणून आपल्या जमिनीचे हस्तांतरण करण्याबद्दलच्या कोणत्याही लेखाच्या संबंधांत कोणत्याही इसमाने किंवा ग्राममंडळाने किंवा त्याच्या वतीने द्यावयाची कोणतीही फी,

**पंचायत म्हणून कार्य करण्याची ग्राममंडळास शक्ती प्रदान करणे.**

३९. (१) ज्या गावात पंचायत कार्य करीत असेल त्या गावाकरिता ग्राममंडळ स्थापन केल्यानंतर, राज्य सरकारने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा ग्रामदान गावाच्या संबंधांत ग्राममंडळ पंचायतीच्या सर्व शक्तींचा वापर करील व अशा पंचायतीची सर्व कर्तव्यें व कृत्यें पार पाडील असे जाहीर केले पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्यानंतर,—

(अ) अधिसूचनेच्या तारखेच्या निकटपूर्वी कार्य करीत असलेली पंचायत ग्रामदान गावाच्या संबंधांत त्यामध्ये कार्य करण्याचे बंद करील ;

(ब) पंचायत अधिनियमान्वये, किंवा त्या त्या वेळी राज्यात अंमलांत असलेल्या कोणत्याही विधीअन्वये पंचायतीस संलग्न असलेल्या सर्व शक्ती, कर्तव्ये, व कृत्ये ही, ग्रामदान गावाच्या संबंधांत ग्राममंडळास संलग्न असतील आणि तदनुसार, ग्राममंडळ, उपरोक्त शक्तींचा वापर करील आणि उपरोक्त कर्तव्ये व कृत्ये पार पाडील ; आणि पंचायतीचे अधिकारी व कर्मचारी हे, पंचायत अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, ग्राममंडळाचे अधिकारी व कर्मचारी होतील किंवा यथा-स्थिती ग्राममंडळाच्या हाताखाली काम करतील ;

(क) पंचायत अधिनियमाच्या कलम ६४ अन्वये न्यायपंचायतीची रचना करण्याच्या प्रयो-जनाकरिता, पंचायतीने निवडून दिलेला इसम हा, त्या अधिनियमाच्या कलम ६४ अन्वये तरतूद केलेल्या रीतीने ग्राममंडळ कोणत्याही इतर इसमाची निवड करीपर्यंत त्या न्यायपंचायतीची रचना करण्यासाठी ग्राममंडळाने आपल्या सदस्यांमधून निवडलेला इसम आहे असे समजण्यात येईल ;

(ड) पंचायत अधिनियमाचे उपबंध, राज्य सरकार अधिसूचनेत निर्दिष्ट करील अशा निर्बंधांस व फेरफारास अधीन राहून, जणू ते ग्राममंडळ त्या अधिनयिमान्वये त्या ग्रामदान गावासाठी रचना केलेली पंचायत आहे असे समजून त्या ग्राममंडळास लागू होतील.

(इ) अधिसूचनेच्या तारखेस पंचायतीची जी मालमत्ता व ज्या जबाबदाऱ्या असतील त्या सर्व मालमत्तेवर ग्राममंडळाचा हक्क असेल आणि ते त्या सर्व जबाबदाऱ्यास अधीन असेल (यात पंचायतीने केलेल्या कोणत्याही संविदे अन्वयेच्या हर्व हक्कांचा व जबाबदाऱ्यांचा समावेश होतो) ;

(फ) उपरोक्त अधिसूचनेच्या तारखेच्या निकटपूर्वी, एखादी पंचायत राज्यातील कोणत्याही न्यायालयातील किंवा न्यायाधिकरणातील कोणत्याही वैध कार्यवाहीतील पक्षकार असेल तर ग्राममंडळ हे त्या पंचायतीऐवजी त्या कार्यवाहीतील पक्षकार होईल किंवा यथास्थिती त्यामधील पक्षकार म्हणून त्याचा समावेश करण्यात येईल, आणि तदनुसार कार्यवाही चालू ठेवण्यात येईल

(३) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेत, राज्य सरकारला आवश्यक वाटेल अशा पूरक, अनुषंगिक आणि परिणामभूत तरतूदींचा समावेश असेल, आणि विशेषत: त्याद्वारे असा निदेश देता येईल की——

(१) पंचायतीस येणे असलेला कोणताही कर, फी किंवा इतर रक्कम ग्राममंडळास देण्यात आली पाहिजे ;

(२) अशा अधिसूचनेच्या तारखेस असा कर, फी किंवा रक्कम याच्या संबंधांत अनिर्णित असलेली अपीले, विनंती अर्ज किंवा इतर अर्ज ग्राममंडळाकडून निकालात काढण्यात येतील.

**ग्राममंडळाचा अध्यक्ष वगैरे लोकसेवक असणे.**

४०. या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या ग्राममंडळाचा अध्यक्ष व कार्यकारी समित्यांचे सदस्य आणि ग्राममंडळाचे अधिकारी व कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असे समजण्यात येईल.

**प्रदान करावयाच्या शक्ती.**

४१. राज्य सरकारच्या सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यास या अधिनियमान्वये आयुक्ताने किंवा यथास्थिती जिल्हाधिकाऱ्याने वापर करावयाच्या मामलेदार किंवा तहसिलदार याच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांस प्रदान करता येतील.

**ग्राममंडळ निष्प्रभावित करणे.**

४२. (१) राज्य सरकारच्या मते एखादे ग्रामंडळ,——

(अ) या अधिनियमान्वये त्याच्याकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम नाही किंवा ती बजावण्यात दुराग्रहाने कसूर करीत असेल, किंवा अ

(ब) या अधिनियमान्वये त्याच्याकडे सोपविण्यात आलेल्या शक्तींचा अतिक्रम करीत असेल किंवा दुरुपयोग करीत असेल, किंवा

(क) या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधांशी सुसंगत असेल अशा रीतीने कार्य करीत असेल तर,

राज्य सरकारला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आपल्या आदेशासंबंधी कारणे देऊन ते ग्राममंडळ सक्षम नाही किंवा ते कसूर करीत आहे किंवा त्याने शक्तीचा अतिक्रम किंवा दुरुपयोग केलेला आहे किंवा या अधिनियमाच्या किंवा यथास्थिती तदन्वये केलेल्या नियमाच्या उपबंधांशी सुसंगत असेल अशा रीतीने कार्य करीत नाही असे घोषित करता येईल, आणि त्या अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने एका वेळी एका वर्षाहून अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरिता ते ग्राममंडळ निष्प्रभावित करता येईल :

परंतु अशी कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी, संबंधित ग्राममंडळांस, नियोजित घोषणा का करण्यात येवू नये याविषयी कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये ग्राममंडळ निष्प्रभावित करण्यात आल्यानंतर,——

(अ) ग्राममंडळाने स्थापन केलेल्या सर्व समित्यांच्या अध्यक्षाने व सदस्यांनी अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेपासून आपली पदे सोडून दिली पाहिजेत ;

(ब) ग्राममंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या सर्व शक्ती व कर्तव्ये ही, ग्राममंडळ निष्प्रभावित करण्यात आल्याच्या मुदतीत, राज्य सरकारच्या बाबतीत वेळोवेळी नेमील अशा इसमास किंवा इसमांना वापरता येतील व पार पाडता येतील ;

(क) ग्राममंडळामध्ये निहीत असलेली सर्व मालमत्ता आणि ग्रामनिधीची कोणतीही शिल्लक, राज्य सरकारमध्ये निहित होईल आणि संबंधित ग्राममंडळाच्या ज्या जबाबदाऱ्या त्याची वैध कर्तव्ये पार पाडताना प्राप्त झाल्या असतील किंवा ज्या संबंधित ग्राममंडळाने पार पाडलेल्या सर्वसाधारण कर्तव्यांच्या ओघात प्राप्त झाल्या असतील अशा जबाबदाऱ्या राज्य सरकारकडे हस्तांतरित होतील आणि राज्य सरकारने, निष्प्रभावित केल्याची मुदत संपेपर्यंत, त्यास आवश्यक वाटतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

(३) अधिसूचनेत निर्दिष्ट केलेली निष्प्रभावित केल्याची मुदत संपण्यापूर्वी, राज्य सरकारच्या मते तसे करणे आवश्यक असेल तर, त्यास आवश्यक वाटेल अशा आणखी मुदतीपर्यंत निष्प्रभावित केल्याची मुदत वाढविता येईल, परंतु, अशी मुदत एका वेळी एक वर्षाहून अधिक असणार नाही, आणि प्रथमत: निर्दिष्ट केलेली किंवा वाढविलेली निष्प्रभावित केल्याची मुदत संपल्यानंतर, ग्राम-मंडळाने आपली कामे पुन्हा सुरू केली पाहिजेत व आपल्या अध्यक्षांची निवड केली पाहिजे व समित्यांची रचना केली पाहिजे :

परंतु, राज्य सरकारला, निष्प्रभावित केल्याची मुदत संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी, पोट-कलम (१) अन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना परत घेता येईल.

(४) निष्प्रभावित केल्याच्या मुदतीत ग्रामदान गावाकडून मिळालेल्या उत्पन्नाचा उपयोग प्रथम, निष्प्रभावित केलेल्या मुदतीत व्यवस्थेचा खर्च भागविण्यासाठी आणि ग्राममंडळाच्या कर्जाची फेड करण्यासाठी केला जाईल आणि शिल्लक रक्कम ग्रामनिधीत जमा केली जाईल.

नियम.

४३. (१) राज्य सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषेकरून आणि पूर्ववर्ती शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा नियमात पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

(अ) कलम ४, पोट-कलम (१) अन्वये करावयाची चौकशी आणि ती ज्या रीतीने करण्यात येईल ती रीत, पोट-कलम (२) अन्वये प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचनेचा सारांश प्रसिद्ध करण्याची रीत, सहा महिन्यांची मुदत मोजण्याच्या प्रयोजनाकरिता तारीख विहित करणे आणि पोट-कलम (३) अन्वये एखादे गाव ग्रामदान गाव होण्यास पात्र नाही हे घोषित करण्याची रीत ;

(ब) कलम ५, पोट-कलम (१) अन्वये सादर करावयाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना, पोट-कलम (४) अन्वये ते प्रसिद्ध करण्याची आणि पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने चौकशी करण्याची रीत ;

(क) कलम ८ अन्वये वजा करावयाचा वसुलीचा खर्च आणि ज्या मुदतीत व ज्या रीतीने राज्य सरकारकडे त्याचा भरणा केला जाईल ती मुदत व रीत ;

(ड) कलम १०, पोट-कलम (२) अन्वये ज्या कालांतरांनी सदस्यांचे नोंदणीपुस्तक अद्यावत करण्यात येईल ते कालांतर ;

(इ) कलम २७, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये ज्या तारखेपूर्वी, किंवा तारखांपूर्वी जमीन महसूल किंवा खंड किंवा कोणताही उपकर, पट्टी किंवा इतर कर देण्यात येतील ती तारीख किंवा त्या तारखा ;

(फ) कलम २८, पोट-कलम (२), खंड (ट) अन्वये पार पाडावयाची इतर कामे, कर्तव्ये आणि वापर करावयाच्या शक्ती ;

(ग) कलम ३०, पोट-कलम (४) अन्वये ज्या रीतीने व ज्या कालांतरांनी जादा उत्पन्न पट्टेदारास देण्यात येईल ती रीत व ते कालांतर ;

(ह) ज्या नियमांना अधीन राहून कलम ३१ अन्वये पैसा उभारता येईल ते नियम ;

(आय) कलम ३४ अन्वये ज्या अभिरक्षेत ग्रामनिधी ठेवण्यात आला पाहिजे ती अभिरक्षा.

(३) या कलमान्वये केलेले नियम, ते आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन असतील.

विनियम.

४४. (१) ग्राममंडळास, राज्य सरकारच्या पूर्वमंजुरीने सर्वसाधारणपणे या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी किंवा तदन्वये केलेल्या नियमाशी सुसंगत असतील असे विनिमय करता येतील.

(२) विशेषकरून आणि पूर्ववर्ती शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध आणता, ग्रामसभेस पुढील गोष्टींची तरतूद करण्यासाठी विनियम करता येतील :—

(अ) कलम ११, पोट-कलम (२) अन्वये मंडळाच्या सदस्यांमधून अध्यक्षांच्या निवडणुकीचे कामकाज चालविणे (यात त्या पोट-कलमात निर्दिष्ट केलेल्या बाबींचा समावेश होतो), पोट-कलम (३) अन्वये अध्यक्षाने वापर करावयाची शक्ती आणि त्याने पार पाडायाची कर्तव्ये आणि पोट-कलम (४) अन्वये पार पाडावयाची प्रशासकीय कर्तव्ये ;

(ब) कलम १२ अन्वये ज्या प्राधिकाऱ्याकडे राजिनामा पाठवता येईल तो प्राधिकारी, आणि ज्या तारखेपासून तो अंमलात येईल ती तारीख ;

(क) कलम १३ अन्वये अध्यक्षास पदावरून दूर करणे ;

(ड) कलम १६ अन्वये कार्यकारी समितीच्या सदस्यांची निवड करण्याची रीत ;

(इ) कलम १७ अन्वये ज्या विनियमास अधीन राहून एखादी समिती नेमण्यात येईल ते विनियम ;

(फ) कलम १८ अन्वये कार्यकारी समितीच्या सदस्यांच्या पदाची मुदत ;

(ग) कलम १९ अन्वये कार्यकारी समितीने वापरावयाच्या शक्ती, पार पाडावयाची कर्तव्ये व करावयाची कामे आणि सभापतीकडे सोपवायची शक्ती, कर्तव्ये व कामे ;

(ह) कलम २० अन्वये ग्राममंडळाचे आणि समितीचे कामकाज चालविणे ;

(आय्) कलम २१ अन्वये चिटणीसाकडे सोपवावयाच्या शक्ती, आणि त्याने पार पाडावयाची कर्तव्ये, आणि चिटणीस, इतर अधिकारी व कर्मचारी यांचे पगार व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, आणि मंडळाच्या चिटणीसास, इतर अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना ज्या परिस्थितीत व ज्या रीतीने पदावरून दूर करता येईल ती परिस्थिती व ती रीत ;

(ज) कलम २६ अन्वये जमीन पट्ट्याने देण्याचे नियमन करणे ;

(के) कलम ३५ अन्वये ग्रामनिधीतून रक्कम देण्याची आणि ग्राममंडळाच्या हिशोबांची तपासणी व फेरतपासणी करण्याची रीत.

४५. कलम ३९ अन्वये दिलेला प्रत्येक आदेश, आणि कलम ४३ अन्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या आदेशात किंवा नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा तो आदेश किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर तो आदेश किंवा नियम राजपत्रात अशा निर्णयाची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा यथास्थिती तो अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे उक्त आदेशान्वये किंवा नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही. **आदेश व नियम विधानमंडळापुढे ठेवणे.**

४६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात,— **सन १९६२चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याची दुरुस्ती.**

(१) कलम ५७ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१), खंड (फ) मधील "पंचायतीच्या सदस्यांनी निवडून दिलेले सरपंच" या शब्दांऐवजी "महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ अन्वये रचना केलेल्या, पंचायतीच्या आणि कार्यकारी समित्यांच्या सदस्यांनी अनुक्रमे निवडून दिलेले सरपंच व सभापती" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील ;

(ब) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) "पंचायतीच्या सदस्यांच्या" आणि "पंचायतीच्या सदस्यांनी" या शब्दांऐवजी अनुक्रमे "पंचायतीच्या व कार्यकारी समित्यांच्या सदस्यांच्या" आणि "पंचायतीच्या व कार्यकारी समित्यांच्या सदस्यांनी" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

(दोन) "सरपंचामधून" या शब्दानंतर "आणि सभापतीमधून" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

(तीन) "त्या पंचायतींच्या" या शब्दांनंतर "आणि कार्यकारी समित्यांच्या" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील ;

(चार) "एका सरपंचाची" या शब्दांनंतर "किंवा सभापतीची" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील ;

(२) कलम ५८, पोट-कलम (२) मध्ये, "सरपंचाच्या" या शब्दानंतर "किंवा कार्यकारी समित्यांच्या सभापतीच्या" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील ;

(३) कलम ५९ च्या परंतुकातील खंड (क) मध्ये, "सरपंच" हा शब्द ज्या दोन ठिकाणी येतो तेथे त्यानंतर "किंवा कार्यकारी समितीचा सभापती" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

(यथार्थ अनुवाद)

**वा. ना. पंडित,**

भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.